# उपेक्षु नको गुणवंता अनंता...



■ समर्थांनी याच गुहेमध्ये बारा वर्ष तपोसाधना केली.

## समर्थभक्तांचा एकाकी लढा...

टाकळीतील हे संस्थान जपण्यासाठी समर्थभक्तांनी न्यायालयात अन् न्यायालयाबाहेर मोठा लढा दिला. मठाला अवकळा येऊ लागल्यावर १९७० मध्ये समर्थभक्तांनी श्री समर्थ रामदास सेवा मंडळ स्थापन केले. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दादासाहेब पोतनीस त्याचे अध्यक्ष होते. हरिभाऊ शेलार, सुधीर शिरवाडकर, डॉ. केशव मुळे आदींचा त्यात सहभाग होता. मंडळाने वर्गणी गोळा करुन मठाचा जीर्णोद्धार केला. तिथे पुन्हा पूजाअर्चा, धार्मिक विधी-उत्सव सुरू झाले. १९७० ला मुंबईतील धर्मादाय आयुक्तांकडे मठाधिपती दिनकरबुवांच्या विरुद्ध मंडळाने दावा दाखल केला. आयुक्तांनी हा दावा मान्य करुन नाशिक जिल्हा न्यायालयात तो चालवण्यास सांगितले. त्याप्रमाणे १९७२ ला सुरू झालेल्या या खटल्याचा निकाल १९८४ मध्ये मंडळाच्या बाजूने लागला. त्याविरुद्ध दिनकरबुवांनी उच्च न्यायालयात धाव घेत स्थगिती मिळवली. त्यानंतर २००५ मध्ये म्हणजे जवळपास २१ वर्षांनी न्यायालयाने ही स्थगिती रद्द ठरवत जिल्हा न्यायालयाचा निकाल कायम ठेवला आणि याच न्यायालयाला संस्थानवर विश्वस्त नेमण्यास व घटना तयार करण्यास सांगितले. २० डिसेंबर २०१२ ला न्यायालयाने संस्थानची घटना मंजूर करुन सात विश्वस्तांच्या नेमणुकीला मान्यता दिली. १९७२ ला खटला दाखल झाल्यापासून २०१२ पर्यंत ४० वर्ष मंडळाच्या विनंतीवरुन संस्थानवर कोर्ट रिसिव्हरची नियुक्ती करण्यात आली. २००० पर्यंत अॅड. एच. व्ही. केळकर, तर त्यानंतर अॅड. दिलीप कैचे रिसिव्हर म्हणून काम पाहत होते. नव्याने तयार झालेल्या घटनेनुसार जिल्हा सत्र न्यायाधीश हे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आणि नाशिकचे तहसीलदार पदसिद्ध सदस्य असतात. सध्या अति. जिल्हा सत्र न्यायाधीश बी. एन. ब्रह्मे अध्यक्ष आहेत, तर सुधीर शिरवाडकर, ज्योतीराव खैरनार यांच्यासह आर्किटेक्ट प्रकाश पवार, अॅड. दिलीप कैचे, सौ. विजया माहेश्वरी हे अन्य विश्वस्त आहेत. प्रत्येक जण आपापला नोकरी-व्यवसाय सांभाळून संस्थानासाठी वेळ देतो. एका अर्थाने गेल्या सत्तर-पंचाहत्तर वर्षांपासून समर्थांची ही तपोभूमी जपण्यासाठी त्यांचा भक्त परिवार एकाकी लढा देतो आहे.